12 MAR 2021
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनास चालना

## ३ कोटी ९१ लाखांची तरतूद; विविध इमारतींसाठी ३३ कोटी रुपये

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वार्षिक अर्थसंकल्पात शैक्षणिक व संशोधन कार्य आणि संशोधनासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. संशोधनाला चालना देण्याकरिता रिसर्च स्कीममध्ये ३.९१ कोटी रुपये देण्यात आले आहेत.

विद्यापीठ अधिसभेत अ‍ॅड. धैर्यशील पाटील यांनी शेरोशायरी करत अर्थसंकल्प सादर केला. त्याला सदस्यांनीही शेरोशायरीने उत्तर दिले. शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ऑनलाईन बुक व जर्नल खरेदीसाठी ग्रंथालय विभागास २ कोटी ५० लाख, विद्यार्थिनी वसतिगृहासाठी १ कोटी ३९ लाख, विद्यार्थी वसतिगृहासाठी २ कोटी ६६ लाख तरतूद केली आहे. यात नवीन वसतिगृह बांधकामासाठी १ कोटी १० लाख रुपये तरतुदीचा समावेश आहे.

कमवा व शिका मुलींचे वसतिगृह नव्याने बांधण्यात आले असून, त्यात सोयी-सुविधा व दैनंदिन खर्चासाठी १० लाख ५० हजारांची तरतूद केली आहे. विद्यापीठात ३८ परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांच्यासाठी पाच बंगला परिसरात वसतिगृहासाठी ४१ लाखांची तरतूद केली आहे. रिसर्च स्कॉलर होस्टेल पूर्णत्वाकडे आले असून, प्रलंबित कामासाठी २५ लाखांची तरतूद केली आहे.

विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचारासाठी १० लाखांची तरतूद केली आहे. विद्यापीठ मेरिट स्कॉलरशिप वर्गणीसाठी २० लाख, दिव्यांगांच्या सुविधांकरिता २.२५ कोटी, संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी १ कोटी तरतूद केली आहे. विद्यापीठातील विविध इमारती दुरुस्ती व नवीन बांधकामासाठी ३३ कोटी ९४ लाखांची तरतूद केली आहे. अधिविभागांच्या गरजेनुसार विविध उपकरणे खरेदीसाठी ४ कोटी २३ लाख, विद्यापीठ परिसरातील रस्ते सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून ९० लाख, नवीन रस्त्यांसाठी संशोधन व विकास निधीतून ३० लाखांची तरतूद केली आहे. विद्यापीठातील खेळांची मैदाने सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून ३७ लाख, विद्यापीठ परिसर सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षक भिंत बांधण्यात येत असून यावर्षी ७५ लाखांची तरतूद केली आहे.

विद्यापीठ परिसर सुशोभिकरणासाठी १ कोटी, नवीन रेकॉर्ड रूमसाठी २५ लाखांची तरतूद केली आहे. संशोधन कार्यास चालना देण्यासाठी रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर ही नवीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी २५ लाखांची तरतूद केली आहे. इनडोर खेळाच्या विविध सोयी उपलब्ध होण्यासाठी इनडोर स्पोर्ट कॉम्प्लेक्स बांधण्याचे प्रस्तावित असून, यासाठी ५० लाखांची तरतूद केली आहे. नव्याने सुरू केलेल्या अधिविभागांसाठी मानव्यशास्त्र इमारत अपुरी पडत असल्याने नवीन अ‍ॅकॅडेमिक कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी २५ लाखांची तरतूद केली आहे. माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी १५ लाखांची तरतूद प्रस्तावित केली आहे.




### सावित्रीबाई फुले यांचा विद्यापीठात पुतळा उभारण्यासाठी तरतूद करा

अर्थसंकल्पावरील चर्चेवेळी सदस्य संजय परमाणे यांनी गेल्या वर्षी संशोधनासाठी ३ टक्के खर्च केला. यावेळेस तो ४ टक्के आहे. संशोधन, पेटंट व पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांसाठी आणखी तरतूद करणे गरजेचे असल्याची सूचना केली. अनिल चौगुले यांनी जिल्ह्यातील धनगरवाड्यांचा सर्व्हे करून सीड बँक तयार करावी. प्रताप (भैय्या) माने यांनी कमकुवत महाविद्यालयांसाठी आर्थिक तरतूद याबरोबरच आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा विद्यापीठात पुतळा उभारण्यासाठी तरतूद करावी, अशी मागणी केली. प्रताप पाटील यांनी विद्यापीठ, महाविद्यालयांना सोलरसाठी अनुदानाची तरतूद केली जावी, अशी सूचना केली.



12 MAR 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची गरज

## प्रा.मधूकर पाटील यांचे प्रतिपादन : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे वक्तृत्व स्पर्धेतील गुणवंतांचा गौरव

प्रतिनिधी
कोल्हापूर

यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी पंचायत राज्य व्यवस्था आणली. त्यांनी समाजकारण, राजकारण, कृषी, व्यापार, उद्योग सहकार आदी क्षेत्रात भरीव कामगिरी केली. अलीकडच्या राजकारणाची दिशा बदलली आहे. यासाठी यशवंतरावांच्या विचारांची गरज आहे, आसे प्रतिपादन प्रा. मधुकर पाटील यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे यशवंत उत्सवांतर्गत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा.पाटील बोलत होते. शाहू स्मारक येथील वक्तृत्व स्पर्धेत स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी विद्यार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण यांचा जीवनपट उलगडत त्यांच्या कार्याचा, विचारांचा जागर केला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, वक्तृत्व स्पर्धा सध्या लोप पावत असल्याचे चित्र आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना वक्तृत्व स्पर्धेची संधी दिली आहे. त्यामुळे त्यांना यशवंतराव चव्हाण यांचे कार्य समजेल. यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल.



कोल्हापूर : येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे यशवंत उत्सवांतर्गत वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांबरोबर कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत, शिक्षणाधिकारी किरण लोहार, प्रा. मधुकर पाटील, रमेश मोरे, अशोक पोवार आदी.

### विजेते स्पर्धक पुढीलप्रमाणे ...

मनपा ग्रुपमध्ये आदिती जाधव प्रथम क्रमांक, प्रसन्न ओंकार व्दितीय क्रमांक, श्रावणी हैबत्ती तृतीय तर श्रध्दा जाधव उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला. जिल्हा परिषद ग्रुपमध्ये आयुष पाटील प्रथम क्रमांक, प्रतिक्षा येरूडकर व्दितीय, जोया मुल्ला तृतीय तर शुभम राणे उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला. कराड ग्रुपमध्ये साजिरी कुंभार प्रथम, हर्षवर्धन पाटील व्दितीय, अथर्व पिसाळ तृतीय तर मधुजा सुर्वे उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला.

वक्तृत्व स्पर्धेत ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विजेत्या स्पर्धकांना कुलगुरू डॉ. शिर्के, शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत, माध्य. शिक्षणाधिकारी किरण लोहार यांच्या हस्ते बक्षिस देवून गौरवण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. राजेश पाटील, प्रा. सौरभ पाटणकर, नसीम जामदार, शीतल हिरेमठ यांनी काम पाहिले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अशोक पोवार, रमेश मोरे यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते.